# ई निविदा

## महाराष्ट्र शासन

## कृषि विभाग

## ई निविदा सुचना क्र. उविकृअउमरेड /नादेकृसंप्र-टप्पा2/4,5,6,7&8/2026-2027 (खुला)

उपविभागीय कृषि अधिकारी **उमरेड जिल्हा** नागपुर कार्यालयामार्फत महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे **नोंदणीकृत पात्र ठेकेदाराकडून** खालील मृद संधारणाच्या क्षेत्र उपचार - संयुक्त गॅबियन बंधारा या कामांकरिता ई निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा बाबतची कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी **उमरेड जि नागपुर** यांनी राखून ठेवला आहे. ठेकेदाराने अटी व शर्ती असलेली निविदा सादर केल्यास ती स्विकारली जाणार नाही.

**उपरोक्त वेबसाईटवर दिनांक 15-05-2026 स. 11.00 वाजेपासून कोरे निविदा संच विक्रीसाठी उपलब्ध आहेत.**

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित किंमत रु | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग | शेरा /लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| **TN06** | **सोमणाळा ता.भिवापूर<br>जुनी भात शेती बांध दुरुस्ती<br>गट क्र– 1,2,3<br>ढाळीचे बांध -1,2,3,4,5<br>एकूण 8 कामे** | **1041671 /-** | **6 व त्यावरील** | **नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा -2** |

1. क्षमता पात्र ठेकेदारांनी निविदा पुर्व अर्हता संचाच्या रु. 590/- नेट बँकींग द्वारे उपविभागीय कृषि अधिकारी, उमरेड यांचे नावे दिनांक 29-05-2026 रोजी दु. 2.00 वाजेपर्यंत जमा करावा.
2. कोणतेही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.
3. निविदा सुचना व सविस्तर कार्यक्रम महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर पहावयास मिळेल.
4. निविदेच्या शर्ती व अटी NIT या कागदपत्रामध्ये या वेबसाईटवर http://mahatenders.gov.in पहावयास मिळेल.
5. जी.एस.टी संबंधात शासनाने वेळोवळी निर्गमित केलेल्या सुचनांचा अधिन राहुन काम करणे बंधनकारक राहील.
6. या कार्यालयास प्राप्त निधीच्या तुलनेतच कार्यारंभ आदेश देण्यात येईल तसेच अनुदान उपलब्धेनुसार देयके अदा करण्यात येईल.
7. ई निविदेसंदर्भात महाराष्ट्र शासनाने व कृषि विभाग यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय बंधनकारक राहतील.

**उपविभागीय कृषि अधिकारी**
**उमरेड**

## निविदेची शर्ती व अटी

1. प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधिन कामांच्या किमती 10 % पर्यंत **कमी** दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधिन किमतीच्या 1 % एवढया किमतीची बँकेची प्रतिपुर्ती हमी/ तेवढया रकमेचा **DD परफार्मन्स सिक्युरिटी म्हणुन निवदि लिफाफा क्र .2 मध्ये सादर करावी** .( **उदा. 1% - 10% कमी दर करिता** 1 % रक्कम )
2. प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधिन कामांच्या किमती 10 % पेक्षा **जास्त** कमी दरांचा असेल तर देकार 10 टक्के पेक्षा जेवढया जास्त कमी दराने आहे तेवढया रकमेची बँकेची प्रतिपुर्ती हमी/ तेवढया रकमेचा **DD परफार्मन्स सिक्युरिटी म्हणुन निविदा लिफाफा क्र .2 मध्ये सादर करावी** .( **उदा. 14% पेक्षा कमी दराने असेल तर - 10% पर्यंत करिता** 1 % रक्कम व 14%-10%= 4% असे एकुण 5% )
3. प्राप्त निम्नतम निविदा देकार निविदाधिन कामांच्या किमती 15 % पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रकमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी. द्वारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा. 19 %कमी दरासाठी खालील प्रमाणें पृथक्करण 10 % कमी दरापर्यंत 1 % व 15 % पर्यंत कमी दरापर्यंत (15%-10%=5%) तसेच (19%-15%)= 4% करिता 4× 2= 8 असे एकुण 1+5+8 =14 %
4. वरील मुददा क्रमांक 1,2,3 संबंधित **अतिरिक्त सुरक्षा ठेव** रकमेचा मुळ धनाकर्ष सिलबंद लिफाफयातुन **उपविभागीय कृषि अधिकारी उमरेड** यांचे नावे उपविभागीय कृषि अधिकारी, उमरेड कार्यालयात **निविदा स्विकृती पासुन विहीत मुदतीत** जमा करावा .लिफाफयावर कामाचे नाव व सुचना क्रमांक लिहीण्यात यावा. अन्यथा आपली निविदा अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी. *
5. **इसारा रक्कम ऑनलाईन** RTGS/NEFT/DD/FDR **द्वारे संबंधित कंत्राटदाराच्या बँक खातयातुनच भरणे बंधनकारक राहील.** *
6. **10 टक्केपेक्षा अधिक कमी दराची निविदा आल्यास दर विश्लेषण आधारावर सविस्तर तपशिल त्वरित सादर करावे.अन्यथा निविदा रदद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**
7. **ज्या निविदा मजुर सहकारी संस्था/सुशिक्षित बेराजगार अभियंता यांचेसाठी राखीव आहे त्याकरिता अनामत रक्क्म भरणा करण्याकरिता कोणत्याही प्रकारची सुट नाही.**
8. बँक प्रतिभुती हमी/डीडी / एफ.डी.आर ची प्रत स्कॅन करुन ई निविदा भरतांना कंत्राटदारांनी अपलोड करावी तसेच कंत्राटदाराने **लिफाफा क्र. 1 व लिफाफा क्र.** 2 मध्ये विहीत नमुन्यात अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम सादर केले असल्याचे शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे. *
9. GST संबंधित शासनाने वेळावेळी निर्गमित केलेल्या सुचनांच्या अधिन राहुन काम करणे बंधनकारक राहील. GSTनोंदणी क्रमांक आवश्यक आहे तसेच GST बाबत गत आर्थिक वर्षाचे (मागील वर्षा अखेरचे)clearance cetificate आवश्यक आहे. *
10. रु. 10 लक्ष आतिल स्थानिक व रु. 10 लक्ष वरील किमतीच्या ई निविदेसोबत जोडलेली (अपलोड केलेली)सर्व कागदपत्रे खरी असलयाबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ठ 1) 500 रु.च्या स्टम्प पेपर वर **लिफाफा क्र.1** मध्ये जोडणे बंधनकारक करण्यात येत आहे. कागदपत्रे खोटी व बनावट आढळल्यास संबंधित कंत्राटदार पुर्णपणे जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.शासन निर्णय क्र.सीएटी 2018/प्रक्र/127/इमा-2/मंत्रालय मुंबई दिनांक 28.11.2018 * **तसेच अपलोड केलेल्या सर्व मुळ कागदपत्रांची तांत्रिक लिफाफा छाननी वेळी व कार्यारंभ आदेश देतांना पडताळणी केली जाईल.त्यांनुसार संबंधित कंत्राटदाराने उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.**
11. निविदेतील लिफाफा क्र.1मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करतांना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यावर निदर्शनास आल्यावर देयक अदा करण्यात येणार नाही व त्यास कंत्राटदार पुर्णपणे जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.
12. काळया यादीत नसल्याबाबातचे प्रतिज्ञापत्र रु.100/- चे स्टम्पपेपर वर जोडणे बंधनकारक आहे.
13. निविदा मंजुर झाल्यास कार्यालयात येवुन अटीची पुर्तता करुन कार्यारंभ आदेश घेवुन सात दिवसाचे आत कामास सुरुवात करणे अनिवार्य राहील.
14. **मजगी पुनर्जीवन** कामासाठी 7 व त्यावरील वर्गातीलच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे नोंदणी झालेल्या पात्र नोंदणीकृत कंत्राटदारांनी ई निविदा प्रक्रियेत सहभागी व्हावे. संदर्भ परीपत्रक मृद व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय म.रा. पुणे जा क्र.मृद 6/ई निविदा 2019/15 दिनांक 14.10.2015*
15. वरील कामाकरिता आवश्यक असणारी मशनरी निविदा धारकांकडे असणे आवश्यक आहे.भाडयाने घेणार असल्यास रु 100/-च्या स्टम्पपेपर वर करारनामा व ज्याचे नावाने मशनरी आहे.त्यांची आरसीबुक जोडण्यात यावी. तसेच मशनरी चे नाव ,बिल इन्व्हाईस,आरसी बुक,खरेदी पावती इत्यादी पुरावे देणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.करारनाम्यावर दर्शविलेलीच मशिनरी कामावर असणे बंधनकारक राहील. कामासाठी नविन यंत्रसामुग्रीचे आयुर्मान 15 वर्षे गृहीत धरण्यात येईल.*

16. **मजगी पुनर्जीवन** कामासाठी अ.जेसीपी ब.ट्रक्टर इत्यादी मशीनरी असणे आवश्यक आहे. *
17. निविदा किमतीइतके **सिंमेट कॉक्रीट बंधारा/सिमेंट प्लग बंधारा/नाला खोलीकरण** पाणी साठवुन ठेवणारे संधानकाचे बांधकाम यांचा **पुर्वानुभव** असलेल्या कंत्राटदारांनाच निविदा स्पर्धात प्राधान्य राहील तसेच अश्या प्रकारचे निविदा किमतीचे काम मागील पाच वर्षापेकी कोणत्याही एका वर्षात केले असले पाहीजे त्याबाबत संबंधित यंत्रणेचा सदरील कामे केल्याचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा अपात्र ठरविण्यात येईल.
18. सदर कामाच्या गटातील 1 अथवा सर्व कामाचे ई निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवले आहे.
19. **एकदा बिड लॉक झाल्यानंतर तांत्रिक लिफाफा उघडतांना त्यांचा लिफाफा क्र .2 उघडण्यात येवु नये अश्या प्रकारचे कोणतेही निवेदन स्विकारले जाणार नाही.अन्यथा जाक/मृदसं/मृद-6/ई निविदा/मासु/**7043**दिनांक** 28.11.2019 **व** 12601/6.4.2023 **प्रमाणे नमुद कार्यवाही करण्यात येईल.**
20. ढाळीचे बांध काम करतांना 25 टक्के अतिरेक छेदाचा बांध संस्क्रणासह टाकणे बंधनकारक राहील.नालीचे बांधकाम झाल्यांनतरच मुख्य बांध व बाजु बांध टाकणे बंधनकारक आहे.
21. ढाळीचे बांध घालतांना वरच्या बाजुना बांधाकरिता लागणा-या आवश्यक रुंदीचे चर काढावे.असे चर खोदतांना बांधपासुन आवश्यक रुंदीचा बर्म सोडावा.बांधाचे शेवटी गवती सांडवा ठेवण्यात यावा.सांडवा व एकत्रित पाणी वाहुन नेणारी नाली (चर)60 सेमी. बर्म ठेवावा.याकरिता जेसीपी /पोकलॅन चा वापर करावा.चर नाही त्यांचे पेमेंट होणार नाही.शेतातील माती लोटुन बांध घालु नये.
22. चर खोदुन बांध घालतांना मातीचे बल्केज(फुगवटा)होत असल्याने विहीत छेदापेक्षा मातीचा बांध 25 टक्के अधिक छेदाचा घालण्यात यावा परंतु मापन पुस्तीकेत मापे नोंदवतांना बल्केजसह मापे नोंदवुन 20 टक्के परिणाम वजा करुन येणा-या शिल्लक परिणामची देयके अदा करण्यात येतील मापे घेतांना हजर राहुन मापन पुस्तिकेवर स्वाक्षरी करावा.
23. ढाळीचे बांध बंदिस्ती मध्ये पाणी साठवायचे नसते ढाळीचे बांधकाम थोडया प्रमाणात उतार दयायचा असतो जेणेकरुन बांधावरील क्षेत्रात गोळा झालेले पाणी बांधाचे वरच्या बाजुला साठुन राहणार नाही.तर बांधाच्या वरच्या बाजुला सावकाशपणे वाहुन शेताचे बाहेर काढले जाईल.बांधावर पाण्याचा दाब पडणार नाही.जमिनीची धुप होणार नाही. बांध फुटणार नाही.बांधाच्या माथ्याचे पाणी गेल्यास त्याला सुध्दा बांधाप्रमाणे 0.2 टक्के उतार दिला पाहीजे.
24. ज्या कंत्राटदाराकडे या उपविभागातील दोन किंवा त्यापेक्षा अधिक निविदा प्रलंबीत असेल अशा कंत्राटदारांना निविदेत भाग घेता येणार नाही.
25. जलसंपदा विभागाचे दरसुचितील खोदकामाच्या बाबीच्या दरामध्ये संस्करणासह पुर्ण बाबीचा समावेश करण्यात आला आहे. वाचा- मृद संधारण पाणलोट व्यवस्थापण कृषि आयुक्तालय म.रा. पुणे 1 यांचे निविदा परिपत्रक जाक्र./मृदस/मृद-6/ई निविदा/2019/2015 दि. 14.10.2015 अन्वये.
26. वरील कामाची निवीदा http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर केलेल्या व वेळापत्रकानुसार डाऊनलोड व प्रिपरेशन करता येतील. तसेच निविदा कागदपत्रांचा तपशिल http://mahatenders.gov.in या संकंतस्थळावर उपलब्ध आहे.
27. निविदा सुचनेतील मृद व जलसंधारण कामाकरिता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनीक बांधकाम विभाग / जिल्हा उपनिबंधक /जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी या प्राधीकरणाकडे योग्य त्या वर्गात पंजीबद्ध असलेलया कंत्राटदारांनाच भाग घेता येईल.सिनाबा कामांकरिता सार्वजनीक बांधकाम विभाग नोंदणी व पुर्वानुभव अनिवार्य आहे.
28. निविदा कारांनी निविदा संदर्भात मागणी केलेले सर्व दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
29. इच्छुक कंत्राटदारांना कोऱ्या निविदा संचाची किंमत ना परतावा व अनामत रक्कम वर दर्शविलेल्या कार्यक्षेत्राप्रमाणे नेट बँकींग किवा इतर नेट बँकींग मध्ये ई- टेंडरींग अंतर्गत ऑनलाईन पेमेंट गेट वे द्वारे विहीत वेळेत जमा करणे बंधनकारक आहे.
30. वरील कामांचे 2 टक्के अनामत रक्कम / सुरक्षा ठेव ही 1 वर्षाच्या दोष दायीत्व कालावधी Defect liability period करिता राखुन ठेवण्यात येईल.
31. या निविदे बाबतची पुढील सर्व कार्यवाही व शुद्धीपत्रके http://mahatenders.gov.in या संकंतस्थळावर उपलब्ध आहे. ऑनलाईन वेळापत्रक उपलब्ध लागु राहील. व अंतीम राहील. इतर अटी व शर्ती निविदा नमुन्यामध्ये पाहावयास मिळतील.
32. पेमेंट अदा करताना कुठल्याही परिस्थीतीत पावर ऑफ अटर्नी स्वीकारली जाणार नाही.
33. ज्या कंत्राटदाराचे नावे कार्यारंभ आदेश आहे त्यांनीच निविदेतील काम करावे. याबाबत कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी यांनी नोंद घ्यावी.
34. कामाचा दोष निवारण कालावधी 5 वर्ष राहील.मृद व जलसंधारण विभाग शा.नि.क्र.जशिअ/2022/प्रक्र302/जल7 मंत्रालय मुंबई दिनांक 3.जाने 2023 मधील नमुद बाबी लागु राहील. ( टीप * या चिन्हाने दर्शविलेल्या पुर्व अहर्ता असणे अनिवार्य आहे.)
35. सदर मृद व जलसंधारणाची कामे नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा – २ च्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे करण्यात येतील

Signature Not Verified

Digitally signed by Sandip Vitthalrao Pahapale
Date: 2026.05.14 17:06:57 IST
Location: Maharashtra-MH

**उपविभागीय कृषि अधिकारी**
**उमरेड**